

मदनमोहन लोहिया यांचा शाल—श्रीफळ आणि मानपत्र देऊन सत्कार करतांना प्रा.वसंत कानेटकर. छायाचित्रात व्ही. टी. पाटीलही दिसत आहेत. (छाया : नसीर अत्तार)

# मदनमोहन लोहिया यांचा सत्कार

कोल्हापूर,ता.१८—(प्रतिनिधी) भारतात स्वातंत्र्योत्तर काळात समाजच उध्वंस्त होऊ पहात आहे, भ्रष्टाचाराच्या कर्करोगाने ग्रासलेल्या देशाचे स्वातंत्र्यात देशाचे स्वातंत्र्यच धोक्यात आले आहे असे प्रतिपादन साहित्यिक नाटककार प्रा. वसंत कानेटकर यांनी आज येथे केले.

मदनमोहन लोहिया मृत्युंजयी महोत्सव समितीने ताराराणी विद्यापीठाच्या प्रांगणात आयोजित केलेल्या गौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. वसंत कानेटकर बोलत होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी व्ही.टी.पाटील होते. प्रा. कानेटकरांच्या हस्ते मदनमोहन लोहिया यांचा मानपत्र, शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

आपल्या भाषणात प्रा. कानेटकर पुढे म्हणाले, एका वर्गास दुसऱ्या वर्गाबद्दल सहानुभूती नव्हती म्हणून देश पारतंत्र्यात गेला. बेचाळीस वर्षापूर्वी देशास पुन्हा स्वातंत्र्य मिळाले. परंतु देशातील भ्रष्टाचाराने स्वातंत्र्यच धोक्यात आले आहे. स्वातंत्र्य टिकवावयाचे असेल तर समाजजागृती झाली पाहिजे. जागृती करण्याचे सामर्थ्य फक्त कला व शिक्षण ही शस्त्रेच करू शकतील.

सत्कारास उत्तर देतांना मदनमोहन लोहिया म्हणाले, मराठी मातीचा गंध मी कपाळास लावला आहे तो अखंड टिकावा. शिक्षण—कला क्षेत्रात अजून काम करावयाचे आहे. माझा पुर्नर्जन्मावर विश्वास नाही, जर झालाच तर तो करवीर नगरीत व्हावा.

व्ही.टी.पाटील डॉ. अंबादास माडगुळकर, कर्नल आनंदराव जाधव, जी. एन. कुलकर्णी, राजंदेकर यांची मदनमोहन लोहिया यांचा गौरव करणारी भाषणे झाली. मानपत्राचे वाचन आप्पासाहेब जाधव यांनी केले. शेवटी डॉ. गोविंदराव गुणे यांनी आभार मानले. समारंभास निमंत्रीत उपस्थित होते.

दैनिक सत्यवादी ता. १९-१-१९९०